
ISSN-2320-4439
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

Volume : II Special Issue Oct.2020



ART'S I COMMERCE I SCIENCE I SOCIAL SCIENCE I
EDUCATION I MANAGEMENT I MEDICAL I ENGINEERING & IT I
LAW I PHARMACY I PHYSICAL EDUCATION I AGRICULTURE I
JOURNALISM I MUSIC I LIBRARY SCIENCE I

Editor: **Dr. Sadashiv H. Sarkate**

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | Challenges and transformation in education | Dr. Surekha Sharma | 1-2 |
| २ | Gandhi, the Proto- feminist: A study with Reference to its validity in Twenty First Century | Prof .Prajakta Raut | 3-8 |
| ३ | Mobile Technology And Its Application For Library Services | Mrs. Deepa Dilip Patil | 9-12 |
| ४ | Time and Narrative: William Faulkner's The sound and the fury | Dr.Kivne Sandipan Tukaram | 13-14 |
| ५ | Histological Studies On Changes In The Basic Protein And Tyrosine Of Digestive Gland Of Lymnea Luteola Infected With Larval Trematodes. | Bhausaheb Shivaji Pagar | 15-20 |
| ६ | Study of Some the Nomedicinal Plants of Osmanabad District used to Cure Diabetes Mellitus. | Ram S. Bajgire | 21-24 |
| ७ | The Effect Of Larval Trematodes On The Glycogen Deposition In The Digestive Gland Of Lymnea Luteola. | Bhausaheb Shivaji Pagar | 25-30 |
| ८ | Women Empowerment Role Of Health & Nutrition | Assist. Prof. Dr. Manisha Pandurang Wanjari | 31-34 |
| ९ | Thestudy ofGender Discrimination in Deborah Ellis'sNovelThe Breadwinner | Kailas BaburaoGiri | 35-37 |
| १० | Geomorphic Analysis Of Aland Facets For Conservation Planningusing Remote Sensing Technique | Dr. Ghodke .J.V. | 38-46 |
| ११ | Innovation Technologies and Library services An Scenario | Sarika Bhagwanrao Rengunthwar | 47-50 |
| १२ | Public Health in India: Issues and Challenges | Geeta K. Toravi | 51-55 |
| १३ | "E- Retailing: Challenges And Opportunities In Global Scenario" | Dr. M. S. Waghmare | 56-59 |
| १४ | "A Critical Analysis of Self Help Group in Marathwada Region" | Surekha Bhimrao Wahule | 60-63 |
| १५ | Dalit Literature: The realistic image of voiceless natives | Dr .S. S.Sasane | 64-67 |
| १६ | The Contribution of Annabhau Sathe to Literature | Mr. ManiyarAbdulkadar Rafik | 68-70 |
| १७ | A Correlation between of Academic Achievement and Aggression in Rural and urban Students | Dr. Sunita Madhavrao Watore | 71-77 |
| १८ | Evaluation of course change detection of Aner River (Godhsagon Gully) | Vaishampayan M. R. | 78-85 |
| १९ | Study Of Self-Esteem And Life Satisfaction Among Employed And Un-Employed Men And Women | Dr. Ajit Baburao Chandanshive | 86-92 |
| २० | महात्मा फुले – आणि कृषिजीवन | प्रा.डॉ.बाळासाहेब गावडे | 93-95 |
| २१ | वारकरी संप्रदायाची पार्श्वभूमी | प्रा.डॉ.जगतवाड एस.पी. | 96-98 |
| २२ | दृकश्राव्य माध्यमासाठी लोकसाहित्याचे उपयोजन | प्रा.डॉ.पोपट सिनारे | 99-102 |


Off. Principal
...N.P.W. College
Lakhani Dist. Bhandara
Late N. P. W. College, Lakhani
Ref No.
Dt.

| | | | |
|---|---|---|---|
| 23 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | प्रा.डॉ. प्रियदर्शनी वसंतराव देशमुख | 10[illegible] |
| 24 | चरित्रात्मक लेखनाच्या प्रेरणा | डॉ. व्ही.एस. केदारी | 10[illegible] |
| 25 | भटक्या मसणजोगी समाजाची लोकपरंपरा व संस्कृती : एक अवलोकन | प्रा.डॉ. सुभाष निवृत्ती शेकडे | 11[illegible] |
| 26 | स्त्रीवाद आणि स्त्रीवादी समीक्षा | प्रा. डॉ. विजय रैवतकर | 11[illegible] |
| 27 | "वडार समाज": देवता, यात्रा, देव्हारा | डॉ. मनिषा नेसरकर<br>सौ.विजयालक्ष्मी विजय देवगोजी | 12[illegible] |
| 28 | त्र्यं.वि.सरदेशमुख यांची नाटके | प्रा.डॉ.विनोद दे. राठोड | 13[illegible] |
| 29 | स्त्रीवादी साहित्य | प्रा.रगेश बलभीम जाधवर | 136-[illegible] |
| 30 | डॉ.विनायक तुमराम यांच्या काव्यातील आदिवासी जिवनचित्रण | डॉ.सुधीर भगत<br>कु.रुपा घोनमोडे | 143-[illegible] |
| 31 | महिलांचे अधिकार आणि समाजाची बंधणे | प्रा. डॉ. प्रमिला डी. भोयर, | 149-153 |
| 32 | 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा सामाजिक चळवळी विषयाचा दृष्टीकोन" | प्रा.डॉ.तानाजी लोखंडे | 154-157 |
| 33 | माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये गाभाभूत घटक विकसित करण्यासाठीच्या कृतीकार्यक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास | भाग्यश्री विलास उबाळे | 158-162 |
| 34 | मानव विकास संकल्पनेचे अध्ययन | डॉ.संतोश तु. कुटे | 163-168 |
| 35 | भारतातील दलित चळवळीत दलित महिलांचे योगदान | प्रा.डॉ.जाधवर बी.डी. | 169-173 |
| 36 | रयतेचा राजा : छत्रपती शिवबा | डॉ. किरण आगतराव जगदाळे | 174-178 |
| 37 | भारतातील शैक्षणिक पद्धतीचा विकास आणि आजची शैक्षणिक स्थिती : समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. कालिदास मारुती भांगे | 179-186 |
| 38 | कोविड -१९ चे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | डॉ.धेडे डी.आर. | 187-194 |
| 39 | आदिवासी कविता की पड़ताल | डॉ.अरविंद कुमार | 195-199 |


Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

Late N.P.W. College, Lakhani
Ref. No.
Dt.
Distt. Bhandara

# महिलांचे अधिकार आणि समाजाची बंधणे

प्रा. डॉ. प्रमिला डी. भोयर,
(सहा. प्राध्यापक) इतिहास विभाग प्रमुख
स्व.निर्धन पाटील वाघाये कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
लाखनी, जि.भंडारा

आज अनेक क्षेत्रात स्त्रिया पुरूषांच्या खांदयाला खांदा लावून कार्य करीत आहेत. नेक क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने धाडसी पाऊल टाकत आहेत. असे असले तरीही समाजातील संख्य स्त्रियांची हुंडाबळी, बालविवाह, भृणहत्या, बलात्काराचे वाढते प्रमाण, दरहजारी —पुरूष प्रमाणात वाढत जाणारी विषमता यासारख्या समस्यांतून सुटका झालेली नाही. जुनही प्रत्यक्षजीवन जगतांना समाजात स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने स्थान मिळालेले नाही. माजात स्त्रि—पुरूष समानता प्रस्थापित झालेली नाही.

आधुनिक कालखंडात भारतात ब्रिटिशांनी राबविलेली धोरणे व केलेल्या सुधारणांचे रतीय समाज व पर्यायाने भारतीय स्त्रिजीवनावर परिणाम घडून आले. पाश्चात्य प्रभावामूळे ब्रिटिशांच्या सतीबंदी, स्त्रिशिक्षण, स्त्रियांचा वारसा हक्क, विधवा पुनर्विवाह यासारख्या नेक कायदयांमूळे स्त्रिजीवनाकडे बघण्याच्या दृष्टीकोनात बदल घडून आला. स्त्रिशिक्षण, निष्ट प्रथांचे निर्मुलन व स्त्रिजीवन सुधारण्यासाठी समाजसुधारकांचे प्रयत्न यातून स्त्रि—पुरूष मानतेचा विचार रूजू लागला आणि स्त्रियांना देखील मानवी वागणूक देणे, त्यांच्या अंगी ल्या गुणांचा व कर्तृत्वाचा आदर करण्याची भावना दृढ होऊ लागली. या दृष्टीने जाराम मोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, बाळशास्त्री जांभेकर, महात्मा फुले, स्वामी दयानंद रस्वती, रा.धो.कर्वे, सावित्रीबाई फुले, पंडीता रमाबाई, रमाबाई रानडे, ताराबाई शिंदे इत्यादींचे कार्य अत्यंत महत्वपूर्ण होय.

स्वातंष्योत्तर काळात स्त्रियांच्या कार्यकक्षेत वाढ झाली. स्त्रि—पुरूष समानतेची कल्पना ाढीस लागली. त्यांच्या समस्या सार्वजनिकरित्या मांडल्या जाऊ लागल्या. स्त्रिमुक्त चळवळींनी ोर धरला. अनेक क्षेत्रात पुरूषांप्रमाणे कार्ये करण्याची संधी मिळाली. महिला सबलीकरणाचे यत्न मोठया जोमाने करण्यास सुरूवात झाली. आज २१ व्या शतकातही भारतीय स्त्रियांनी माज जीवनाच्या सर्वच क्षेत्रात आपले कर्तृत्व सिध्द केलेले आहे. इंदिरा गांधी, प्रतिभाताई ाटील, कल्पना चावला, किरण बेदी, लता मंगेशकर, साधनाताई आमटे, मेघा पाटकर अशा क ना अनेक स्त्रियांनी वेगवेगळया क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविलेला आहे.

असे असतांना आजही अनेक पक्ष, पुढारी व सनातनी लोक हे जातीभेद व धर्मभेद ाढविण्याचे कार्य करीत आहेत. त्यांच्याव्दारे अशा थोर सुधारकांच्या विचारांचा स्वत:च्या वार्थाकरीता उपयोग केल्याचे पदोपदी आढळून येते. सनातनीवश्त्ती व पुरूषी अहंकारातून त्यक्ष जीवनात स्त्रि—पुरूष समानता नाकारण्यात येते. एकीकडे भारतीय स्त्रि अंतराळात वेश करून मुक्त संचार करीत आहे. तर दुसरीकडे आजही पृथ्वीवरील देवदेवतांच्या र्शनाकरीता आसुसलेल्या स्त्रियांना मंदिर आणि दर्ग्यामध्ये प्रवेश नाकरल्या जाते हे वास्तव टूर आहे.

आजसुध्दा स्त्रियांना निर्भयपणे वावरता येत नाही. अजुनही स्त्रियांच्या मनात भयग्रस्तपणा ाणवतो. दिल्लीसारखी 'निर्भया'च्या प्रकरणाची धास्ती घेत—घेतच स्वातंष्याचा उपभोग ावा लागत आहे. म्हणूनच स्त्रियांच्या बाबत ''सातच्या आत घरात'' असे काहिसे चित्र



Off. Principal
N.P.W. College
Late N. P. W. College
Ref No.
Dt.
Distt.

बघायला मिळते. तात्पर्य अजूनही भारतीय समाजात खऱ्या अर्थाने स्त्रि–पुरूष समानता प्रस्थापीत होऊ शकली नाही. स्त्रियांचा दर्जा कनिष्ठ असल्याचे पदोपदी दिसून येते.

स्त्रि–पुरूष समानतेवर आपण खूपवेळा विचार करतो. कायदयानी स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने स्थान दिलेले आहे पण समाजानी दिले का? हा एक मोठा प्रश्न पडतो. समाजाने कशाला घरच्यांनी स्त्रियांना–पुरूषांच्या बरोबरीने स्थान दिले का? हाही एक वादाचा विषय आहे. कायदयांनी जरी स्त्रि–पुरूष समानता मिळाली असली तरी जोपर्यंत कायदयाला समाजाचे पाठबळ मिळत नाही तोपर्यंत कायदा पूर्णपणे अंमलात येत नाही. उदा. १९६१ च्या कायदांनी हुंडा घेणे आणि देणे गुन्हा आहे तरीपण समाजात ही प्रथा चालू आहे. हूंडयासाठी मूलीला ठार मारले, आत्महत्या केली, जाळले असे आपण रोज वर्तमान पत्रात वाचतो. जो पर्यंत समाज हे स्विकारत नाही की, हुंडा देणे हे चुकीचे आहे तो पर्यंत ते बंद होणार नाही. एखादया मुलाच्या वडीलांना हुंडा दिला नाही तर दुसरा व्यक्ती तयार होतो त्यामुळे हया वाईट प्रथा बंद होत नाहीत.

एखादी मुलगी लग्नहोवून पतिच्या घरी जेव्हा ती राहायला येते तेव्हा तीने कसं राहायला पाहीजे? घरातील चाली–रीती, प्रथा–परंपरा काय आहेत? हया नीट समजून घ्याव्या लागतात. तीने घरी काय वापरायचे व काय वापरू नये हे घरची मंडळी किंवा पुरूषवर्ग ठरवते. कपडे मुलीला घालायचे परंतु ठरवणारे मात्र घरची वडीलधारी मंडळी. एका कुटूंबात आई–वडिल, मूलगा आणि मुलगी असा कुटूंब असेल तर बाबा बाहेर जातांनी मी बाहेर जावून येते अस सांगतात पण जावू का? अस विचारत नाही मात्र आईला बाहेर जायचे असेल तर ती विचारूनच जाते जातांनी आणि येतांनी तीची वेळ ठरलेली असते. थोडा वेळ जरी झाला तरी कुठे गेली होती हा प्रश्न पुढे येतो.

मुलगी जन्माला येते तेव्हापासूनच आपण तीला सांगतो की, तु मुलगी आहेस तुला मुलीसारखे केश वाढवणे, कान –नाक टोचणे, सकाळी लवकर उठून भांडे घासणे, घरकाम करणे इ. काम मुलगी करते पण आपण मुलाला हेच काम का? सांगत नाहीत. यावेळी कुठे गेली समानता. आई सकाळी उठून संगळयांसाठी नाश्ता तयार करते आणि टेबलवर लावते तेव्हा सगळे बसून खातात आणि आई मात्र वाढते परंतू तीला आमच्यासोबत बसून तू पण नाश्ता कर असे मात्र कोणीच म्हणत नाहीत. जेवण करतांना सुध्दा संगळयांचे जेवण झाल्यावरच जेवण करते. आईला आपली पसंत नसते असे म्हटले तरी चालेल कारण ती आपल्यापेक्षा घरच्या इतर मंडळीचांच जास्त विचार करते. स्त्रिया पैसे कमावणाऱ्या असल्या तरी त्या मर्जीप्रमाणे पैसे खर्च न करता सांभाळुन किंवा पतीला विचारूनच पैसे खर्च करतात. एखादी वस्तू घ्यायची असेल किंवा घर प्लॉट घ्यायचा असेल तर आधी पतीला विचारावे लागते.

मुली जेव्हा घराबाहेर जातात तेव्हा त्यांना सांगीतल जाते की, ७ वाजेपर्यंत घरी पोहचलच पाहिजे परंतु हि बंधने मात्र मुलांसाठी का नाही. मुलगा मात्र १० वाजता नंतरही घरी आला तरी चालतो. परंतु मुली ऐवजी मुलांना ७ वाजता घरी येण्यास सांगितले तर मुलींना रात्री उशीरा घरी येत असतांना मुलांची भिती राहणार नाही व मुली निर्भयपणे बाहेर फिरू शकतील आणि निर्भयासारखे प्रकरण घडणार नाहीत.

कायदयांनी स्त्रियांना अनेक अधिकार दिले आहेत. आणि स्त्रियांसाठी कायदेही बनले परंतू स्त्रिया कायदयांचा वापर किमी प्रमाणात करतात आपण दररोज वर्तमानपत्रात स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाच्या बातम्या वाचतो पण किती? स्त्रिया कायदयाचा आधार घेतात आणि



Off. Principal
Late N.P.W. College
...hani, Distt. Bhandara

...ादी स्त्रि कोर्टात गेली तरी तिला किती न्याय मिळतो किंवा ती कोर्टातील पायरी ...ण्याआधिच दबावामुळे किंवा माहेरच्या मंडळींच्या इज्जतीसाठी तर कधी मुलांसाठी तर ...ी समाजाच्या लाजेसाठी कोर्टात जाण्याऐवजी घरीच घुटमळत राहते. काही खटले हे ...ळे ओलांडून गेले तरी आर्थिक अडचणीमुळे मध्येच थांबवावे लागतात. एखादया स्त्रिला ...य मिळाला तरी किती पुरूषांना सजा होते.

स्त्रियांचे घराबाहेर निघुन काम करण्याचे प्रमाण पुरूषांपेक्षा कमी असल्याचे दिसते ...जा एखादी स्त्री जॉब करत असेल तर, ऑफीसमध्ये तीला प्रत्येकवेळी पुरूषाचा सामना ...वा लागतो. तीला मिळालेले प्रोमोशन ती घरातील अडचणीमुळे किंवा जाण्या—येण्यामुळे ... नाही. मी ज्या जागी आहे तीथच खुश आहे असे म्हणते. मोठ—मोठया पदावर सुध्दा ...षांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण कमीच आहे. राजकीय क्षेत्रात सुध्दा बोटावर मोजण्याएवढयाच ...या दिसतात. मुलगा आणि मुलगी शिक्षण घेत असतील तर आईवडीलही मुलीपेक्षा ...ांच्या शिक्षणावर जास्त खर्च करतात आणि मुलगी परकीय धन म्हणून तिच्याकडे दुर्लक्ष ...ल्या जाते. वस्तु/सामानासारखे मुलींकडे बघीतले जाते. तिच्या शिक्षणावर विशेष खर्च ...ल्या जात नाही.

आई — वडिल आणि मुल मिळून कुटूंब तयार होतो. परंतु घरचा प्रमुख म्हणून ...डेलांनाच मान दिल्या जाते. आईला मात्र दुय्यमच स्थान असतो. घरात एखादी कोणती ...ट करायची असेल तर आधि वडीलांची परवानगी घ्यावी लागते. कोणत्या—ना कोणत्या ...रणांनी घरातील स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते. घरात मुलगा आणि मुलगी असेल तर ...ई ...डलांच्या संपतीवर दोघांचाही सारखाच अधिकार असावा अशा प्रकारचा कायदा ...ण्यात आला परंतू आई—वडिल किंवा भाऊसुध्दा मुलीला संपत्तीचा वाटा देत नाही. तु ...गी पराया धन म्हणून तिला जन्मत:च सांगितल्या जाते. लग्नानंतर नौकरी लागली तर त्या ...ाचा उपयोग आम्हाला होणार नाही असे त्यांचे मत असते. आणि एखादी मुलगी ...त्तीचा वाटा मागण्यासाठी जर कोर्टात गेली तर तीच्यासोबत संबंध तोडल्या जाते व ...ाजही तीला चांगला मानत नाही. परंतु यात तीची काहीच चूक नसते. मुलीला जन्मत:च ...गितल्या जाते किंवा 'लग्न करतेवेळी सांगितल्या जाते कि माहेरून तुझी बिदाई आणि ...या सासरवून अस्थी उठेल' त्यातुन तिला हेच सांगितले जाते की सासरी कितीही त्रास ...ला तरी तु तीथेच राहा पण माहेरी परत येवु नकोस. अशा वेळी माहेरच्या मंडळींनी ...ासा दयायला पाहीजे परंतू तसे न करता उलट त्याच परिस्थीतीत राहायला सांगतात. ...मुळे मुली आत्महत्या करतात. हे सर्व थांबविण्यासाठी काही उपाययोजना करायला ...ीजेत ते खालीलप्रमाणे......

**...ंगभेद :—**

लिंगचाचणी करून मुलगा—मुलगी असा भेद भाव करू नये सर्वांना समानतेची ...नूक दयावी, आणि समाजाला शिक्षण देवून व मुलीचे महत्व पटवून देवून मुलगी ...त्याच बाबतीत कमी नाही हे पटवून दयावे.

**...ी बंधणे :—**

मुलगी आहे म्हणून तीच्यावर समाजांनी बंधणे लादायची व मुलगा आहे म्हणून ...ला मोकळा सोडायचा यामुळेच गुन्हे घडतात. हे थांबवण्यासाठी समाजाची बंधणे दोघांवरही ...णे आवश्यक आहे.

**...यांमधील शक्ती :—**

स्त्रिला अबला म्हटलं जाते परंतू ती अंबला नसते ती आपल्या आतील शक्तीला



Late N. P. W. College, Lakhani Dist. ... Ref No....... Dt.
Off. Principal

जागवत नाही. तीच्या आतील स्त्रि—शक्ती बाहेर आली तर ती काहीही करू शकते. परिवर्तनही करू शकते. स्वत:चे रक्षणही करू शकते.

**गरीबी :—**

माणसांना वाईट सवय लावत असेल तर गरीबी. गरीबीमुळे माणुस काहीही गरीब घरच्या मुली शान—शौकतीने जगण्यासाठी आणि दोन पैसे मिळवण्यासाठी व्यवसायासारखे व्यवसायही करतात. त्यामुळे गरीबी दूर करणे आवश्यक आहे.

**सुरक्षितता :—**

मुली घरून बाहेर पडतात तेव्हा त्यांना फार सावध राहावे लागते. बरीच मुले छेळखाणी करतात अशा वेळी मुलींनी ग्रुपणी जावून मुलांना सबक शिकवायला म्हणजे मुलांची हिंमत होणार नाही. तसेच आत्मसंरक्षणासाठी कराटे प्रशिक्षण द्यायला जेणेकरून एकटी मुलगी अनेक मुलांना सांभाळू शकेल.

**समाजातील बदल :—**

मुला—मुलींमधील भेदभाव त्यांच्यावरची बंधणे, संपत्तीमधील वाटा, पेहराव, बघण्याचा दृष्टीकोण हया सर्व गोष्टीकडे बघण्याचा समाजानी दृष्टीकोण बदलविला

**मुलीच्या लग्नाचे वय :—**

मुलीच्या लग्नाचे वय वाढविले पाहीजे. कळीचे फुल होण्यापुर्वीच आपण लग्न करून तीच्यावर कुटूंबाची जबाबदारी सोपवतो. म्हणजेच वयानी व बुध्दीनी होण्यापूर्वीच आपण घर संसाराची जिम्मेदारी सोपविली. त्यामुळे तीची प्रगती खुंटते पुढील शिक्षण घेण्याऐवजी मुल सांभाळण्यातच वेळ घालवतो. त्यामुळेही तीला दुय्यम मिळते म्हणून शिक्षण पूर्ण घेतल्यानंतरच मुलीचे लग्न करायला पाहीजे.

**निष्कर्ष :—**

एकंदरीत अजूनही स्त्रि मुक्तीचा बराच पल्ला गाठावयाचा बाकी आहे. ग्रामीण आदिवासी स्त्रिया तसेच मुलींमध्ये स्वत:च्या पायावर उभे राहण्याची ताकद निर्माण करण्याची गरज आहे. सोबतच अनष्टि पारंपारीक रूढीप्रथा यातूनही स्त्रिजीवन मुक्त करण्याची आहे. कारण आजही आपल्या देशात मुलीला जन्मास येण्यापुर्वीपासूनच संघर्ष लागतो. तर पुढे तो तिच्या अस्तित्वाचा झगडा बनतो. अशा स्थितीत पुरूषांच्या बरोबरीने पाऊले टाकत तिला समृध्द राष्ट्राच्या उभारणीत सहभागी व्हावयाचे आहे. उज्वल भविष्यावर नजर ठेवत स्वप्नपूर्तीकडे तिचे पाऊल अधिक आत्मविश्वासाने पडेल यात शंका जगज्जेता नेपोलियन बोनापार्ट म्हणतो की —"मुझे एक योग्य माता दो, मै तुम्हे एक राष्ट्र दुंगा!" निश्चितच एवढी क्षमता स्त्रिमध्ये आहे. आता प्रश्न आहे संधी मिळण्याचा मिळणाऱ्या संधीचे सोने करण्याचा.

पूर्वापार चालत आलेल्या प्रथेप्रमाणेच आजही मुलीला घरात कुटूंबात आणि समाजात सुध्दा दुय्यम स्थान दिले जाते. स्त्रियांना निर्णय घेण्याएवढी बुध्दी नसते असे समजल्या संपत्तीवर मुलाप्रमाणे तीचा वाटा नसतो. मुलगी जन्माला आली असेल तर आईलाच ठरवून पती मुलासाठी दुसरी पत्नी करतो. घराजील स्वयंपाक, धुणी—भांडी करण्याचे काम स्त्रिचे आहे असा ठरवून देणारा समाज एकंदरीत स्त्रि ही मुलपैदा करणारी, घरकाम करणारी आणि पैसे कमवणारी मशिनच, तीला काही भावना नसतात अस समजल्या जाते तिच्या भावनांचा विचारही केल्या जात नाही. परंतु स्त्रि ही जागृत झाली तर सर्व जग हलवू शकते हे समाज मात्र विसरत आहे.

घरात काही विपरीत घडल तर त्याचे खापर स्त्रिच्या माती फोडले जाते, मुली



Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

...नाही तर, स्त्रिचाच दोष समजल्या जाते. पतीच्या कामात नुकसान झाल तर, स्त्रिला ...शी समजल्या जाते; अकाली पतीचे निधन झाले तर स्त्रिलाच जबाबदार धरून समाज ...गावर अन्याय करतो पण पत्नीचा मृत्यु झाल्यास पतीला का दोषी ठरवत नाही? घटस्फोट ...यास मुलीचाच दोष दाखविल्या जातो. म्हणजेच सर्व वाईट गोष्टी व गुन्ह्यांना स्त्रिलाच ...बदार धरल्या जाते.

...ष :—

स्त्रि ही घरकाम करणारी, कामवाली नसुन ती एक जिवंत जितीजागती भावना ...लेली मानव प्राणी आहे असे समाजानी समजायला पाहिजे. स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने ...र दयायला पाहीजे आणि ते आपल्या घरापासून सूरू करायला हवे. मुलींबरोबर मुलांनाही ...ाम करायला शिकवायलास पाहीजे. मुलींना मुलांप्रमाणेच उच्चशिक्षण देवून मोठया ...वी नौकरी करण्यास प्रोत्साहन दिले पाहीजे. स्त्रियांच्या इच्छेचा सन्मान केला पाहीजे तरच ...यांची समाजाची आणि देशाची प्रगती होईल.

...र्भ ग्रंथ सूची :—


कीर धनंजय, स.ग. मालशे संपा : महात्मा फुले समग्र वाङ्:मय, तृ.आ. १९८८, संपादकाचे निवेदन

कुलकर्णी अ.रा. — महात्मा ज्योतीराव फुले, सामाजिक आणि शैक्षणिक कार्य डायमंड पब्लिकेशन्स प्रथम आवृत्ती जुलै—२००८

...ॅप्युलर प्रकाशन मुंबई, चौथी आवृत्ती १९९२.

लांजेवार डॉ. ज्योती — भारतीय समाज आणि स्त्री, सुगावा प्रकाशन पुणे ३०, प्रथमावृत्ती २८ मार्च २००५.

नरके हरी संपा : महात्मा फुले साहित्य आणि चळवळ, महाराष्ट्र शासन मुंबई, प्र.आ. २००६

फडके य.दी. संपा : म.फुले समग्र वाङ्:मय—सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक, १९९१

फडके य.दी. संपा : म.फुले समग्र वाङ्:मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, च.आ १९९१

माळी मा.गो. — क्रांती ज्योती : सावित्रीबाई ज्योतीराव फुले, आशा प्रकाशन गारगोटी, तिसरी आवृत्ती १९८९.

रानडे शांता — सावित्रीबाई ज्योतीबा फुले, जीवन कार्य, लोकसाहीत्य प्रकाशन औरंगाबाद, आवृत्ती १९९८.

साने गीता : भारतीय स्त्री जीवन, मौज प्रकाशन मुंबई, दु.आ. १९९७

) यशदा — यशमंथन अंक १ ला, जानेवारी—मार्च २०१४ (त्रैमासिक), यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा पूणे)


◆◆◆



Off. Principal
Late. N.P.W. College
Late N.P.W. College, La...
Ref No.
Dt.